# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २३/२००९/ दिनांक :

प्रति,

श्री. महादू ज्योती कांबळे,
रा. खेरीवडे, ता. गगन बावडा, अर्जदार
जि. कोल्हापूर.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,
कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता(संवसु)
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग १,

जि. कोल्हापूर.

३) सहाय्यक अभियंता (संवसु).
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभाग कळे,
जि. कोल्हापूर.

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



## <u>न्याय निर्णय</u>

<u>श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच तर्फे</u> दिनांक : ०४.०६.२००९

श्री. महादू ज्योती कांबळे, रा .खेरीवडे, ता. गगन बावडा, जि. कोल्हापूर यांचे ( ग्रा.त.नि.मंच प्रकरण २३/०९) तेथे असलेल्या शेतीपंप वीज जोडणीस वि.प.कडून ५ वर्षे वीज पुरवठा बंद असतांना बील आकारले/ अवास्तव रकमेचे बील दिले या बाबत बील दुरुस्ती व्हावी अशी मागणी केली आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांजकडे क्ष नमुन्यात दि. २५.११.२००८ रोजी तक्रार दाखल केली होती. त्यावर कक्षाने आदेशपत्र क्र. ००२९५ दि. १६.१.२००९ ने दिलेला निकाल मान्य झाला नसलेने त्यांनी ग्राहक तक्रार निवारण मंचकडे दि. १९.३.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने वि.प.चे संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार संदर्भात मुद्देनिहाय म्हणणे मागविले व प्रथम सुनावणी दि. ८.४.२००९ व नंतर दि. १८.४.२००९ व दि. २९.४.२००९ रोजी कोल्हापूर येथे पार पडल्या. सुनावणीवेळी स्वत: तक्रारदार श्री. कांबळे (वर्धन) तसेच वि.प.तर्फे श्री. रविंद्र कोलप, उप कार्यकारी अभियंता, सहाय्यक लेखापाल, कोल्हापूर ग्रामीण विभाग २ आणि सहाय्यक अभियंता व सहाय्यक लेखापाल, कळे उप विभाग हजर होते.

<u>तक्रारदार यांचे म्हणणे</u>

सदर शेती पंप वीज जोडणी वडिलांचे नांवे जीवनधारा योजने अंतर्गत मिळाली. वडिल १९९५ साली मयत झाले. वि.प.ने १९९८ मध्ये थकबाकी कारणास्तव वीज जोडणीचा वीज पुरवठा बंद केला कनेक्शनच्या वायर काढून नेल्याने व तो पुढे तसाच सलग डिसेंबर २००२ पर्यंत बंद राहिला. दरम्यान वीज जोडणी कायमस्वरुपी बंद होईल या शक्यतेने, धास्तीने त्यांनी वि.प.ची संपर्क साधून तात्पुरती रक्कम य. ६३५०/– दि. १२.१२.२००२ रोजी भरुन जोडणीचा वीज पुरवठा चालू करुन घेतला. तसेच त्याचवेळी सुरुवातीपासून असलेली अश्वशक्ती आधारीत जोडणीला मीटरबसवून घेतला. तदनंतर दि. २९.३.२००४, दि. २४.४.२००६

व दि. २७.३.२००७ रोजी प्रत्येकी रु. ५०००/– प्रमाणे एकूण रु. १५,०००/– बिलापोटी भरले आहेत. मीटर बसविलेनंतर वि.प.कडून नियमित रिडींग न घेता अंदाजे रकमेचे बीले देण्यात आली. १९९८ अखेर पर्यंत रु. ७९६२.८४ व त्या पुढील काळाची रु. १९३१२.६८ असे एकूण रु. २७२७५.५२ चे देणे दाखविलेले बील व प्रत्यक्षात भरलेली बील रक्कम रु. २९३५०/– विचारांत घेता एकूण रक्कम रु. ५००००/– होत आहे. तर दुसरे बाजून ५ वर्षे वीज पुरवठा बंद राहिला. पीके घेता न आलेने शेतीचे वार्षिक रु. ८०,०००/– ते १,००,०००/– पर्यंत नुकसान झाले आहे. जानेवारी २००३ पासून २००९ पर्यंत ११२० युनिटसचा वापर झाला आहे जो वर्षाचा १५० ते १६० युनिट व महिना १३ ते १४ युनिट आहे व त्यामुळे एकूण वि.प.ने आकारलेले ५०,०००/– चे वीज बील अयोग्य आहे हे स्पष्ट होते.

वि.प.चे म्हणणे

श्री. महादू जोती कांबळे, खेरीवडे तर गगन बावडा यांचे शेतीपंप वीज कनेक्शनचा वीज पुरवठा १९९८ मध्ये थकबाकी कारणास्तव तात्पुरत्या स्वरुपात बंद केला होता. ग्राहकाने थकबाकीपैंकी कांही रक्कम भरल्यानंतर ग्राहकाचे लेखी विनंतीवरुन वीज पुरवठा दि. १६.१.२००३ रोजी चालू करुन दिला होता. सदर १९९८ ते २००३ काळात ग्राहकास ३ अश्वशक्तीवर आधारीत कमीत कमी दराने बील आकारणी करणेत आली. सदर बील रक्कम ग्राहकाने भरली नसलेने रक्कम वाढली आहे. थकबाकी रकमेची ग्राहकास माहिती दिली आहे. ग्राहकाचे तक्रारीवर अंतर्गत कक्षाने दिलेल्या नियमानुसार ९९ ते २००० काळाचे बील पाठवून दिले आहे ते अद्याप भरले नाही.



सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

सदरहू तक्रार प्रकरणात वितरण कंपनीचा ग्राहक असलेल्या तक्रारदाराचे वीज कनेक्शनचा वीज पुरवठा मार्च १९९८ अखेर असलेल्या वीज बील थकबाकीस्तव तोडलेचे दिसते. त्यानंतर ग्राहक व वि.प. या दोघांनीही हा विषय नियमित करुन घेण्यास ५ वर्षे दुर्लक्ष केले. वि.प.ने वीज जोडणी तोडलेनंतर कायमस्वरुपी वीज कनेक्शन बंद करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. सबब वीज जोडणी कागदपत्रावर सलग चालू राहिली. दरम्यान १९९९मध्ये मूळ अर्जदाराचे निधन झाले आहे. मयत व्यक्तीचे नावावरील वीज कनेक्शन संबंधित वारसाचे नांव त्वरीत लावणेची कार्यवाही होणे आवश्यक ठरते. सुनावणी दरम्यान अर्जदाराने वीज कनेक्शनचे नाव बदला करीता वि.प.कडे अर्ज दिला असलेचे सांगितले.

तक्रारदार यांचे नांवे वीज कनेक्शनचा वीज पुरवठा तात्पुरते बंद केला, त्यावेळी मार्च १९९८ मध्ये असलेली थकबाकी यांनी व्याजासह भरणे, तसेच ५ वर्षेनंतर वीज जाडणी जानेवारी २००३ मध्ये चालू केल्याने मधल्या काळातील वीज बील, ग्राहकाचा वीज पुरवठा बंद राहिलेमुळे, वीज बील न लावणे उचित होईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता व या प्रकरणामध्ये अर्जदारातर्फे दाखल केलेल्या वेळोवेळी भरलेल्या पैंशाच्या पावत्यांचा विचार करता तसेच वि.प.तर्फे दाखल केलेल्या सीपीएलचा विचार करता, खालील प्रमाणे अर्जदाराकडे मूळ थकबाकी रु. ७९६२.८४ व त्यावरील व्याज तसेच त्याने वेळोवेळी भरलेल्या रकमा याचा ऊहापोह खालील प्रमाणे करणेत येत आहे.

१)    अर्जदाराने म्हटल्याप्रमाणे ता. २९.३.२००४ रोजी रु. ५०००/– वि.प.कडे भरणा केला याचा सीपीएलमध्ये उल्लेख दिसून येत नाही तसेच अर्जदाराने पावती हजर केलेली नाही.  सबब अर्जदार म्हणतो ती रक्कम विचारात घेता येत नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| २) | सन १९९८ पर्यंत थकबाकी | .. | रु. ७९६२.८४ |
| ३) | वरील रकमेवर डिसेंबर २००२ पर्यंत व्याज | .. | रु. ४८७२.०० |
| ४) | एकूण रक्कम | .. | रु. १२८३४.८४ |
| ५) | ता. १२१२.२००२ रोजी अर्जदाराने भरलेली रक्कम | .. | रु. ६२००.०० |
| ६) | बकी रक्कम | .. | रु. ५६३४.८४ |
| ७) | वरील मूळ थकबाकी शिल्लक (१७६२.८४) येणे रकमेवर पुढील व्याज देणे | .. | रु. ३१७.०० |
| ८) | एकूण देणे रक्कम | .. | रु. ५९५१.८४ |
| ९) | ता. २१.४.२००६ व २९.३.२००७ रोजी अर्जदाराने भरलेली रक्कम | .. | रु. १००००.०० |
| १०) | वरील मुद्दा क्र. ८ मधील येणे रक्कम वजा | .. | रु. ५९५१.८४ |
| ११) | अर्जदाराची वि.प.कडे शिल्लक रक्कम | .. | रु. ४०४८.१६ |



वरील प्रमाणे ता. २९.३.२००७ अखेर अर्जदाराची वि.प.कडून येणे शिल्लक रक्कम य. ४०४८.१६ ही अर्जदाराचे पुढील चालू बिलापोटी समायोजित करुन घेता येऊ शकते.  अर्जदाराचा विद्युत पुरवठा हा सन १९९८ मध्ये थकबाकी भरली नसलेने बंद झाला होता व तो पुढे अर्जदाराने जानेवारी २००३ मध्ये सुरु करुन घेतला आहे व त्यावेळी अश्वशक्तीप्रमाणे बिलाची आकारणी करणे ऐवजी मीटर बसविण्यात आले.

वरील कारणमिमांसेमध्ये सन १९९८ ते जानेवारी २००३ या काळामध्ये विद्युत पुरवठा जो बंद करण्यात आला त्या बाबत बील आकारणी वि.प. यांना करता येणार नाही, कारण नियमाप्रमाणे असा विद्युत पुरवठा कायमचा बंद केला आहे असे मानावे लागते.  सबब त्या काळातील कोणत्याही प्रकारची बिलाची आकारणी वि.प.स करता येणार नाही.  त्या काळातील बील व सीपीएलची बाकी चुकीची व अग्राह्य आहे.   मात्र जानेवारी २००३ नंतर सीपीएलच्या नोंदीप्रमाणे अर्जदारास वेळोवेळी जी बिले देण्यात आली आहेत त्याबाबत सीपीएलमध्ये दर्शविल्याप्रमाणे भरणांचा विचार करता, सप्टेंबर २००४ पर्यंत अर्जदाराची रक्कम ही वि.प.कडे शिल्लक होती. पुढे डिसेंबर २००४ ते मे २००५ या काळात अर्जदारास जी बिले देण्यात आली होती ती बिले शासनातर्फे जाहीर कृषि संजीवनी योजनेमार्फत भरण्यात आलेली आहेत.  परिणामी, मे २००५ चे बिलापर्यंत अर्जदार ग्राहकाकडे कोणतीही बाकी नव्हती.  सबब सप्टेंबर २००५ नंतर पुढे मार्च २००९ पर्यंत अर्ज़दारास जी कांही बिले देण्यात आली आहेत त्याप्रमाणे अर्जदाराकडे एकूण येणे रक्कम ही रु. १३६१.०० एवढी दिसून येते.  सदरची रक्कम ही अर्जदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.  या संबंधात अर्जदाराचे वर क्र. ११ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वि.प.कडे शिल्लक रक्कम रु. ४०४८.१६ यातून वरील येणे रक्कम वजा जाता अर्जदाराची वि.प.कडे मार्च २००९ अखेर शिल्लक रक्कम ( रु. ४०४८.१६ – रु. १३६१.०० ) रु. २६८७.१६ एवढी होय.

वरील प्रमाणे मार्च २००९ पर्यंत त्यावेळी असलेल्या मिटरमध्ये अखेरची नोंद १२०० युनिटची होती व त्याचा वरील प्रमाणे हिशोब करण्यात आला आहे. त्या मीटर बाबत ता. ९.३.२००९ रोजी तो मीटर जळाल्याचे ता. २५.३.२००९ रोजी नव्याने मीटर बदलण्यात आला आहे. सबब असा ता. २५.३.२००९ रोजी नव्याने बसविलेल्या मीटर बाबतचा हिशोब वरील तपशिलामध्ये नाही. सबब प्रस्तुत निर्णय हा अर्जदाराचे जुन्या २५.३.२००९ च्या अगोदर असलेल्या मीटर संबंधातच आहे. परिणामी, अर्जदाराचे २५.३.२००९ ला नव्याने बसविलेल्या मीटरवरील वापरलेल्या युनिटचा हिशोब अर्जदारास नियमाप्रमाणे वि.प.ने पुढे द्यावयाचा आहे व तो अर्जदाराने भरणेचा आहे. मात्र वर दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराची वि.प.कडे शिल्लक रक्कम रु. २६८७.१६ ही वि.प.च्या खात्यावर शिल्लक दाखवून पुढील बिलापोटी समायोजित करणेची आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता, खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

२) मार्च १९९८ ते डिसेंबर २००२ या काळामध्ये विद्युत पुरवठा बंद करण्यात आला होता. त्या काळातील वीज बील अर्जदारास माफ करण्यात येत आहे.

३) वरील न्याय निर्णयात दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराकडील १९९८ पर्यंतची थकबाकी तसेच अर्जदाराचे जानेवारी २००३ ते मार्च २००९ पर्यंतचे चालू विद्युत देयक त्याने वेळोवेळी भरलेल्या पैंशातून भरले गेले आहे असे जाहीर करण्यात येत आहे.

..५..

४) २५ मार्च २००९ पर्यंत अर्ज़दाराची वि.प.कडे रु. २६८७.१६ ही शिल्लक रक्कम आहे असे जाहीर करण्यात येत आहे. अशी रक्कम अर्जदाराचे ता. २५.३.२००९ नंतरचे बिलामध्ये समायोजित करण्यात यावी.

५) संबंधित मूळ ग्राहक श्री. महादू जोती कांबळे हा सन १९९९ मध्ये मयत झाले आहेत. प्रस्तुत वीज जोडणी ही त्यांचे वारस श्री. शिवाजी महादू कांबळे ( वर्धन) यांचे नांवे वि.प.ने जरुर ते शुल्क आकारणी करुन त्यांचे नांवे बदलून देण्यात यावे.

६) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

७) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ०४.०६.२००९

( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :